पान ८



मलिका-ए-तरन्नुम - सूरसम्राज्ञी - नूरजहान पकिस्तानची राष्ट्रीय संपत्ती होती व भारताची मर्मबंधातली ठेव होती. 'मर्त्य मानव अमर संगीत' या कार्यक्रमासाठी १९८२ साली ती फाळणीनंतर प्रथमच ३५ वर्षांनंतर भारतात आली तेव्हा तिच्या स्वागताप्रीत्यर्थ केलेल्या भाषणात तिचा 'जुगनू'चा नायक दिलीपकुमार टाळ्यांच्या गजरात म्हणाला होता, 'जितने साल आपने यहाँ आने में लगाये हैं, ठीक उतने ही साल हमने आपका यहाँ बेताबी से इंतजार किया है.'

जखिणी फार सुंदर असतात म्हणे! त्यांचा आवाजही कोकिळेसारखा असतो. वशीकरणाचे सगळे मंत्र त्यांना मुखोद्गत असतात. माणसं त्यांचा ध्यास घेऊन झुरणीला लागतात. त्या झपाटतात, पछाडतात व नादी लावतात. नूरजहान ही अशीच एक ज़ालीम जखीण होती. तिनं झपाडलेल्या झाडांची रानंच्या रानं आजही अस्तित्वात आहेत. वाऱ्याच्या झुळकीसारखी ही स्वरांची बनं बहरतात. सळसळणाऱ्या पानांतून सुरेल सुरांच्या स्मृती चाळवतात आणि धुंदफुंद गुंजन सुरू होतं. 'सावरिया तोहे...', 'आ इंतजार है तेरा...', 'ये कौन हंसा दिल में...', 'क्या यही तेरा प्यार था...', 'किसी तरहसे मुहब्बत में चैन पा न सके...', 'बदनाम मुहब्बत कौन करे...', 'आ जा मेरी बरबाद मुहब्बत के सहारे...', 'आँधियाँ गम की यूँ चलीं...', 'दीया जलाकर आप बुझाया...', 'बुलबुलो मत रो यहाँ आँसू बनाना है मना...' अक्षरशः अंगावर काटा आणतं. तिच्या आवाजाची 'रेंज' थक्क करून टाकतं. म्हणूनच असेल कदाचित ऑर्केस्ट्रात 'बुलबुलो'च्या वाट्याला जाण्याचं धाडस कोणी करीत नसावं, लताचं 'वंदे मातरम्' तरी कुठं कोण म्हणतं ? नकलाकारांना अशीच आपल्या कुवतीची व वकुबाची जाणीव होत राहिली तर संगीतदेवता त्यांची आजन्म ऋणी राहील.

नूरजहानचं चेटूक मी ४० वर्षांपूर्वी मुंबईच्या 'इंपिरियल'मध्ये प्रथम अनुभवलं. मी 'जुगनू' पहात होतो. (भारतातील तिचा अखेरचा चित्रपट मी प्रथम पाहिला व 'अनमोल घडी', 'खानदान', 'गाँव की गोरी', 'मिर्झा साहेबाँ' आदी आधीचे चित्रपट नंतर पाहिले.) मोठेमोठे बोलके डोळे, नाजुक जिवणी, इवलीशी हनुवटी, सुबक नाक, कोरीव भुवया व गोल चेहऱ्यावर उन्मादक गोडवा. देह मात्र किंचित गरगरीतपणाकडे झुकणारा. तिच्यापेक्षा अडीच तीन वर्षांनी मोठ्या असलेल्या फाटक्या दिलीपकुमारच्या मानाने ती गुटगुटीत वाटत होती. एका प्रसंगात ती दिलीपला विचारते, 'क्या तुम मेरा बोझ उठा सकोगे ?' तेव्हा थिएटरात हास्याची लकेर उमटली. तिच्याकडे एक दृष्टिक्षेप टाकून तो जेव्हा उत्तरतो, 'कोशिश करूंगा' तेव्हा तर हास्याचा स्फोट झाला.

पण चित्रपट पुढं सरकू लागला, कथा आकार घेऊ लागली, तशी एक विलक्षण गोष्ट जाणवली, 'ज्वारभाटा', 'प्रतिमा' व 'मिलन' या केवळ तीन चित्रपटांचा अनुभव गाठीशी असलेला कोवळा, पोरसवदा दिलीपकुमार नूरजहानला सरळ सरळ 'खात' होता.

मग तिनं ब्रह्मास्त्र काढलं! मध्यंतरापूर्वी 'उमंगें दिलसे मचलीं' या गाण्याने तिने आपल्या सामर्थ्याची नुसती चुणूक दाखवली होती. आता ती बेभानपणे गात सुटली- 'हमें तो शामे-गम में काटनी है जिंदगी अपनी...', 'आज की रात...', 'तुम भी भुला दो...'... सरसर तिच्या कंठातून अमर संगीत पाझरू लागलं. सारं वातावरण, नूरजहानमय होऊन गेलं...

चित्रपटात शेवटी तिला क्षयरोग होतो. ती खोकत खोकत 'हमें तो शामे-गम में' म्हणते तेव्हा तो स्वर काळीज चिरत जातो. 'वहीं चलिये- वहीं चलिये' या शब्दांवर तो इतका आर्त, रडवेला होतो की गलबलून येतं. मी दिलीपकुमारला पाहायला गेल होतो. परतलो नूरजहानला हृदयी घेऊन! एक तरुणपणीच वठलेलं झाड त्याच्याही नकळत झपाटलं गेलं होतं...

संगीतकार नौशादच्या मते नूरजहानचा (आणि शमशादचाही) आवाज माइकचा 'मोहताज' नव्हता. 'अरे साब, उन्हें स्टुडियो के बाहर खडा करके गाना रेकॉर्ड करो, कुछ फर्क नहीं पडनेवाला' असं नौशाद एकदा माझ्याजवळ म्हणाला होता. (स्टुडिओच्या आत रेकॉर्ड करताना नौशादने शमशादची साथ का सोडली हा तपशील इथे अप्रस्तुत ठरतो.) माझ्या मते नूरजहानच्या आवाजाचा 'व्हॉल्यूम' मोठा होता व ताकद जास्त होती. तिच्या आवाजावर व गायकीवर असा काही 'नूरजहानी' शिक्का होता की कुठल्याही नायिकेच्या तोंडी तो शोभू शकला नसता. हेच कुंदनलाल सैगलविषयीही म्हणता येईल. अर्थात सैगलप्रमाणेच नूरजहानही (भारतात असेपर्यंत) पार्श्वगायन करीत नव्हती. ती पडद्यावरची स्वतःची गाणी स्वतः गायची एवढंच. पाकिस्तानात गेल्यावर आणि नायिका होण्याचं वय सरल्यावर ती पार्श्वगायन करू लागली व कमालीची यशस्वी झाली. नूतन आणि वैजयंतीमाला किंवा माला सिन्हा आणि साधना यांच्या तोंडी नूरजहानचा आवाज कदाचित नसता शोभला पण पाकिस्तानी मुस्लिम नायिकांना तिचा अनुनासिक आवाज फिट्ट बसला. गाण्याचा तिचा अनुनासिक मुसलमानी ढंग, आवाजाचा दाणेदार पोत, शब्दांची दिलेर फेक, स्वरांचा

लडिवाळपणा अन् या सगळ्याला असणारा तो खास 'नूरजहान टच' यामुळे नूरजहानची गाणी अविस्मरणीय ठरली.

फाळणीच्या वेळी 'नूरजहानला मारणार' अशी मुंबईत आवई उठली (असे संगीतकार कै. के. दत्ता ऊर्फ कोरगावकर सांगत.) आणि भेदरलेली नूरजहान पती शौकत हुसेन यांच्यासह रातोरात पाकिस्तानला पळाली. पाकिस्तानला गेलेल्या खुर्शीद, स्वर्णलता, रागिणी, रेहाना व मीना शोरी लगेच अस्ताला गेल्या. नूरजहान मात्र नवीन राष्ट्राची नवीन राणी झाली. सीमेपलीकडून तिचा आवाज घुमू लागला- 'बन पतंगा उड जाऊंगी...', 'छमाछम नाचे जिया...', 'मोरे मन के राजा...', 'तुम जिंदगी को गम का फसाना बना गये...', 'मुझसे पहली-सी मुहब्बत मेरे मेहबूब ना माँग...', 'दमादम मस्त कलंदर...',

खालच्या मजल्यावर राहायची. मला तिच्या घरात 'पडदा' नव्हता. गाणं बसवायला मी तिथं अनेकदा गेलोय. शागिर्दानं गुरूकडून गाणं शिकावं त्या नम्रतेनं ती चाल शिकून घेई. मी गायचो, ती गायची. मध्येच 'ठीक गा रही हूँ ना ?' असं विचारायची. तशी स्वभावानेदेखील मनमिळावू आणि लाघवी होती. रेकॉर्डिंगला आली की पेटीवरून बोटं फिरवील, गप्पा मारील, साथीदारांची आपुलकीनं चौकशी करील. पण हे सगळं तिचा नवरा शौकत हुसेन हजर नसेल तेव्हा. त्याच्या उपस्थितीत ती दूर एका बाजूला मुखस्तंभासारखी बसून राही.''

'दीया जलाकर आप बुझाया'च्या एका आठवणीवर कोरगावकरांनी आयुष्य काढलं. त्यांच्याशी कुठल्याही विषयावर बोला, गाडी 'दीया जलाकर'पाशी येऊन थांबे व तिथून हलता

तिनं झपाटलेल्या झाडांची रानंच्या रानं आजही अस्तित्वात आहेत. वाऱ्याच्या झुळकीसारखी ही स्वरांची बनं बहरतात. सळसळणाऱ्या पानांतून सुरेल सुरांच्या स्मृती चाळवतात आणि धुंदफुंद गुंजन सुरू होतं- 'सावरिया तोहे...', 'आ इंतराज है तेरा...', 'ये कौन हंसा दिल में...', 'आ जा मेरी बरबाद मुहब्बत के सहारे...'

आहें न भरीं, शिकवे न किये...

'दिल के अफसाने...', 'चाँदनी रातें...'

'नादान' आणि 'बडी माँ'मधील नूरजहानची गाणी गाजूनही व 'दामन' आणि 'रिश्ता'ला उत्तम संगीत देऊनही कोरगावकरांची करिअर होऊ शकली नाही. ''नूरजहान गयी और साथ मेरा साज ले गयी'' असं ते म्हणत व बळेबळे हसत. त्यांच्या भेटीत नूरजहानचा विषय निघाला नाही असं होत नसे.

''नूरजहान म्हणजे क्या बात है!' अण्णा कोरगावकर खुशीत येत म्हणत, 'ती म्हणजे चालतं बोलतं संगीत होतं. स्वरांना आंदोलनं देऊन लाडिकपणानं मागं सरकणं हे तिनंच करावं. सूर कसा खणखणीत, पक्का! बाईची तान बंदुकीच्या गोळीसारखी सणकन जायची. काळीज हेलावून सोडायची. कितीही अवघड चीज तिला द्या. तिच्या गळ्यातून ती अचूक उमटे. ती गाण्यात मजा घेऊन गायची. डोकेबाज! 'डोल रही है मन की नैया' किंवा 'करत इशारे सांझ का तारा' या 'दीया जलाकर आप बुझाया'मधील ओळीतील षोडशीची लाडिक, निरागस अदा पाहा. माझं म्हातारं थोबाड नका बघू. नूरजहान डोळ्यापुढे आणा आणि बघा, लयीच्या अंगानं प्रत्येक सूर गेलाय... त्यातून ती अभिनेत्री होती. त्यामुळे नेमके भाव तिच्या सुरांतून उमटत. या इथं अजिंक्य डॉक्टरांचं नर्सिंग होम आहे ना, तिथं

हालत नसे. त्यांचा वृद्ध चेहरा उजळून निघायचा. चष्म्याआड डोळे चमकून उठायचे. पेटीवर भिरभिरणाऱ्या बोटात जादू संचारायची. घसा खाजू लागायचा.

''पाच ऑगस्ट १९४४. शनिवार. श्रावण वद्य प्रतिपदा,'' कोरगावकर गढूळ डोळ्यांनी म्हणत, ''उपास होता माझा. दुपारी चारच्या सुमारास आम्ही रेकॉर्डिंगसाठी 'सेंट्रल स्टुडियो'त आलो. 'बडी माँ'चा निर्माता व दिग्दर्शक मास्टर विनायक तिथं होता. जेमतेम १८ लोकांचा माझा वाद्यवृंद होता. अनिल विश्वासचा असिस्टंट रामसिंग आल्टो-सेक्साफोन वाजवीत होता. प्यारेलालचा बाप रामप्रसाद ट्रंपेटर होता. पीटर-डोरॅडो हे व्हायोलिनवादक होते. महंमद शफी सतारीवर होता. स्वामी जंगम (ऑर्गन) नि बाबालाल इस्लामपूरकर (तबला) तयारीत होते. साडेचार वाजता नूरजहान आली. तिनं पांढरीशुभ्र वस्त्रं परिधान केली होती. एखाद्या आस्मानच्या परीसारखी दिसत होती. मी माझ्या रिवाजाप्रमाणे वादकांवर अत्तराचा फवारा मारला. नूरजहाननं तिच्या रिवाजाप्रमाणे अल्लाची प्रार्थना केली. आता सर्व तयारी झाली. वातावरणात नशा भरून राहिली होती. 'दीया जलाकर'वर नूरजहानने असा काही खाडकन् 'धैवत' लावला की आम्हा सर्वांच्या डोळ्यात पाणी उभं राहिलं. बाईचं गाणं म्हणजे काय! जान ओतून गायली.

पहिलाच 'टेक' ओके झाला. आमच्यातल्या प्रत्येकाला एक प्रकारची बेहोशी आली होती. तृप्ती जाणवत होती. तिथून पाय निघत नव्हता...''

'दीया जलाकर'ने पंजाब पेटला. तिथल्या एका 'जळून खाक' झालेल्या पंजाबी तरुणाने पुढे कितीतरी वर्षांनी कोरगावकरांना पेटी भेट दिली. त्या तरुणाचं नाव होतं ओ. पी. नय्यर!

नूरजहान जेमतेम पाच वर्षे हिंदी चित्रसृष्टीत होती. 'जवाँ है मुहब्बत...', 'आहें ना भरीं...', 'आवाज दे कहाँ है...', 'नाचो सितारो नाचो...', 'यहां बदला वफा का...' यांसारख्या मूठभर गाण्यांनी आज जवळजवळ ६० वर्षांनीही तिच्या आवाजाची व गायकीची मोहिनी कायम असावी हे 'गलेबाजी'चं कर्तृत्व विस्मयजनक व असामान्य म्हणावं लागेल. (तीच गोष्ट सैगलची!) नूरजहानने भारताचा त्याग केला नसता तर इथे तिचं निर्विवाद कर्तृत्व किती पटींनी बहरलं असतं की लता मंगेशकरच्या जबर स्पर्धेत त्याला खीळ बसली असती, यावर शिळोप्याच्या वेळेला चर्चा करण्यापलीकडे आज आपल्या हातात काही नाही. नूरजहान भारतातून निघून गेली म्हणून लता मंगेशकरचा मार्ग मोकळा झाला अशी सोयीस्कर भूमिका काही कडव्या पाकिस्तान्यांनी घेतली होती. उलट ''लताच्या स्पर्धेत टिकाव धरणे नूरजहानला जड गेले असते'' असे मत

पाकिस्तानात व्यक्त करून पै. तलत महमूदने तिथल्या लोकांची नाराजी ओढवून घेतली होती.

दोन देशांतील रसिकांत कशीही रस्सीखेच असो, नूरजहान व लता यांच्यात खूपच ममत्व होतं. मास्टर विनायकच्या 'बडी मां'च्या वेळेस मांजरीप्रमाणे पायात घुटमळणाऱ्या लहानग्या लतात नूरजहानने तेव्हाच उद्याची सार्वभौम गायिका पाहिली असेल काय ? नूरजहानचा लतावरील पगडा तिच्या सुरुवातीच्या काळातील गाण्यांवर उघड दिसतो. श्यामसुंदरसारखे संगीतकार नूरजहानमय होतेच. लता आणि श्यामसुंदर एकत्र आल्यावर साहजिकच 'बहारें फिर भी आयेंगी...' (लाहोर), 'ऐ दिल उनको याद न करना...' (बाजार) ही थेट नूरजहान ढंगात म्हटलेली गाणी जन्माला आली. षण्मुखानंद हॉलमध्ये नूरजहानच्या उपस्थितीत झालेल्या त्या ऐतिहासिक कार्यक्रमात लताने म्हणण्यासाठी निवडलेलं गाणं नेमकं श्यामसुंदरचं 'बाजार'मधील 'साजन की गलियां छोड चले' होतं. हा खास नूरजहानला दिलेला 'तोहफा' होता. पूर्वी एकदा उभय देशांच्या परवानगीनं दोघी सीमारेषेवर 'नो मॅन्स लँड'वर कडकडून भेटल्याही होत्या. मुंबईत 'ताज'मध्ये लता नूरजहानला आवर्जून भेटायला गेली तेव्हाही दोघी अशाच उराउरी भेटल्या. "त्यांच्यात एकदम मिठीच मारतात." लता नंतर मला हसत हसत म्हणाली. त्या दिवशीचं नूरजहानचं छोटेखानी भाषण दृष्ट लागण्यासारखं होतं. "लता आज ऐसे मकामपर है की तिनं समजा ठरवलं की मी आता कोणाकडे बघणार पण नाही तर तेदेखील क्षम्य आहे. पण सबसे बडी बात तो ये है कि उसके पाँव जमीन पर हैं!"

लताचे पाकिस्तानात व पाकिस्तानचे लताकडे वारंवार फोन व्हायचे. भारतातून तिकडे गेलेले कलावंत ठरलेल्या दिवशी ठरलेल्या वेळी एकाच्या घरी जमायचे आणि मग फोनवरून गप्पा रंगत. लता नूरजहानला गाऊन दाखवायची. दोन्ही देशांच्या टेलिफोन ऑपरेटर्सची चंगळ व्हायची. लता गुलाम हैदरला ट्रीटमेंटसाठी भारतात बोलवायची. आपल्या परराष्ट्र खात्यातील कोणीतरी लताला सावधगिरीचा इशारा दिल्यामुळे हा फोनवरचा सुरेल सिलसिला बंद पडला.

गाताना जिभेवर मधाचा थर असलेली नूरजहान बोलताना तशीच वेळ आली तर तीच जबान एखाद्या चाबकासारखी वापरायची. समोरच्याची चामडी लोळलीच पाहिजे. मुंबईत तिची 'प्रेस कॉन्फरन्स' झाली. माझ्या समोरच एका वृत्तसंस्थेच्या प्रतिनिधीने तिला विचारलं. "मोहतरमा, तीन देशांच्या तीन महान गायिका एकाच मंचावर आणण्याची कल्पना तुम्हाला कशी वाटते ?"

"मैं कुछ समझी नहीं." खोट्या पापण्या खऱ्यासारख्या फडफडवीत नूरजहान म्हणाली.

"मला म्हणायचंय की, पाकिस्तानच्या तुम्ही, आमची लता मंगेशकर आणि बांगलादेशची रूना लैला."

"देखिये"- पराकाष्ठेची 'तहजीब' दाखवीत नूरजहान मृदू आवाजात म्हणाली, "मैं तो कुछ भी नहीं हूँ. आपकी जूती के बराबर. लेकिन खुदा के लिए किसी ऐरे-गैरे का नाम लता के साथ मत लीजिये. ये उनकी तौहीन है."

निघाला का कानाखाली आवाज! 'मुझे मेरे कुत्ते की और नूरजहान की आवाज बहुत पसंद है' हे रूना लैलाचे कथित अशिष्ट उद्‌गार नूरजहानच्या डोक्यातून गेलेले नव्हते.

एक गाणारं भारतीय जोडपं पाकिस्तानात कार्यक्रम करून आलं. नंतर कोणीतरी नूरजहानला त्यांच्याविषयी मत विचारलं.

"वो ठीक रहा." नूरजहानने त्यातल्या पुरुषाविषयी मत दिलं.

"आणि त्याची बायको ?"

"नहीं-नहीं. वो तो उसकी चारपाई है." नूरजहान निर्विकारपणे म्हणाली.

दूरदर्शनवर दिलीपकुमारने नूरजहानची मुलाखत घेतली. शेजारी नूरजहानची तरुण मुलगी बसली होती. जुन्या आठवणी काढताना तिच्याकडे बघत दिलीपकुमार म्हणाला, "तब तो ये पैदा भी नहीं हुई थी."

"तब तो सायराजी भी पैदा नहीं हुई थी." नूरजहानने जोडा हाणला.

नूरजहानच्या खाजगी आयुष्याविषयी काहीबाही वेडंवाकडं ऐकायला मिळायचं. त्यातलं खरं किती व अतिरंजित किती कळायला मार्ग नाही. जगासाठी तिनं आपली 'इमेज' केवळ गळ्यापुरती मर्यादित ठेवली होती. एरवी तिचं आयुष्य हे तिचं आयुष्य होतं. ते ती बेगुमानपणे मन चाहेल तशी जगली. पहिल्या हार्टअटॅकनंतरही ती घसा जाळणारी दारू पीत राहिली व जीभ भाजणारी तिची आवडती लोणची खात राहिली. 'आहें ना भरीं, शिकवे न किये' हे तिचं बहुधा सर्वात गाजलेलं गाणं असावं. तेच तिच्या आयुष्याचे सूत्र सांगतं. नूरजहान दु:खाचे उसासे टाकत बसल्याचं किंवा आल्यागेल्यासमोर आपल्या कर्मकहाण्या रडत बसल्याचं ऐकिवात नाही. ती तिच्या मस्तीत जगली, खरोखरच 'आहें न भरीं, शिकवे न किये...'

■ शिरीष कणेकर